# ऋणनिर्देश

साठोत्तरी मराठी साहित्यामध्ये स्त्रीवादी साहित्य आपले वेगळा असा ठसा निर्माण केला आहे. या स्त्रीवादाचे तत्व पचवून काही लेखिकांनी लेखन केले तर काही स्त्रीवादाला समांतर राहून लेखन केले. या दृष्टीने प्रिया तेंडुलकरांच्या नायिका स्त्रीवादाच्या डोळयाने वावरणाऱ्या आहेत. त्यांनी स्त्रियांची दुःखे, वेदना, अपमान, पिळवणुक यांचा परामर्श घेतला आहे. नागरी साहित्यामध्ये वेगळेपणा दाखवणाऱ्या आहेत. म्हणून प्रिया तेंडुलकरांच्या कथेच्या वेगळेपणाचा अभ्यास करावा असे वाटले. या भूमिकेतून माझे मार्गदर्शक डॉ.विजय निंबाळकरांनी मान्य केला. विषय निवड झाल्यानंतर अभ्यासाला सुरूवात झाली. यासाठी अनेक व्यक्तींचे, गुरूवर्यांचे मला बहुमोल सहकार्य लाभले.

कर्मवीर हिरे महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य डॉ.श्रीकांत जोशी यांनी माझी शिक्षणाची तळमळ बघून कमवा आणि शिका योजनेसाठी शिफारसपत्र देऊन फार मोठे उपकार केले. त्यांचे मी आभार मानतो. त्याचबरोबर रा.वि.परूळेकर ग्रंथालयातील ग्रंथपाल श्री दिंडेसर आणि कर्मचारी वर्ग यांनी वेळोवेळी संदर्भग्रंथ पुरवून फार मोलाची मदत केली. त्यांचेही आभार.

श्री सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगुडचे प्राचार्य डॉ.जयंत कळके यांची माझ्या एम.फिल.पदवीसाठी असणारी तळमळ, वेळोवेळची आपुलकीची विचारपूस, त्याचबरोबर संदर्भग्रंथासाठी पुरवलेले ग्रंथ आणि आशीर्वाद यामुळेच मी हे संशोधन करू शकलो. डॉ.कळकेसरांची आभार मानून उतराई होण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहणे मला आवडेल.

माझ्या परिस्थितीची दखल घेऊन मला कमवा आणि शिका योजनेत प्रवेश दिल्याबद्दल संख्याशास्त्र विभागाचे विभागप्रमुख आणि भवनचे अधीक्षक डॉ.डी.टी.शिर्के व जैविक तंत्रशास्त्र विभागाचे डॉ.गुरवसर यांचे आभार मानतो.

मराठी विभागप्रमुख डॉ.कृष्णा किरवले, डॉ.रवींद्र ठाकुर, डॉ.विश्वनाथ शिंदे यांच्याशी वेळोवेळी केलेली चर्चाही मला उपयोगी पडली त्यांचेही मी आभार मानतो.

प्रिया तेंडुलकरांविषयी लिखाण उपलब्ध करून देण्यात मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागातील डॉ.अरूणा दुभाषी यांचेही बहुमोल सहकार्य लाभले त्यांचेही आभार.

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे प्रा.शिवाजीराव होडगेसर यांचेही प्रेरणा सतत पाठीशी राहिली. विद्यार्थी भवनमधील माझे मित्र प्रा.युवराज देवाळे, रमेश दळवी, अशोक पालकर, अर्जुन माळी, गजानन शिंदे इत्यादी अनेकांचे मला सहकार्य मिळाले आहे. त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

ज्यांच्या पितृतुल्य आशीर्वादाने मी बी.ए.झालो, वैयक्तिक मार्गदर्शनामुळे नुकताच एम.ए. झालो नाही तर प्रथम वर्ग मिळविला, ज्याच्या व्यासंगी व्यक्तिमत्वाचा आदर्श ठेवून मी नेट परीक्षा उत्तीर्ण झालो त्या गुरूवर्य डॉ.निंबाळकरसरांचे आभार मानून त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यापेक्षा यापुढेही त्यांच्या ऋणात राहणे हसतमुखांने पसंत करेन.

जी स्वतः अंगठेबहाद्दर असताना शेतात काबाडकष्ट करून मला एम.फिल.पर्यंतचे उच्च शिक्षण देणारी आई आणि वडील यांचे ऋण शब्दांच्या आभाराने फिटतील का?

टंकलेखक श्री.मिलिंद भोसले यांनी टंकलेखनाची बाजू सांभाळली. एम.फिल.प्रवेशापासून ते प्राबंधिक लेखनाच्या आणि बांधणीच्या निमित्ताने प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे अनेकांचे सहाय्य झाले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**श्री शिवाजी वसंत देसाई**
अभ्यासक

# प्रस्तावना

'कथा' हा मराठी वाङ्मयामध्ये स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून मान्यता पावला आहे. त्याला स्वतःचा असा घाट आहे. यामध्ये अनेक कथाकारांनी भर घालून त्याला आशय, विषय, भाषा, प्रांत, अभिव्यक्ती अशा सर्वांगाने मोठा केला आहे. यात गोष्टी, लघुकथा, दीर्घकथा, रूपककथा इत्यादी अनेक प्रकार आहेत. फार वर्षापूर्वी ती 'गोष्ट' किंवा 'कहाणी'च्या रूपात सांगितली जायची. हरिभाऊंपासून ती मराठीत लिहिली जाऊ लागली. ललित साहित्यात एक स्वतंत्र प्रवाह बनली. नियतकालिकांनी तिला मोठे केले. लेखकांनी लिहिलेली कथा वाचकांपर्यंत पोहचविली ती नियतकालिकांनीच. यात मोठा वाटा नियतकालिकांचा दिसून येतो.

या कथाप्रवाहाला स्त्रियांचेही योगदान मिळाले आहे. १८९६ पासून स्त्रियांनी कथालेखनाची कामगिरी केलेली आढळते. कथाकारानी जसे घटनाप्रसंग, रहस्ये, भाव-भावना, समस्या, दुःखे, समाजजीवन इत्यादी कथेत आणले तसेच कथालेखिकांनीही आपल्या व्यथा,वेदना, दुःखे, समस्या कथेतून मांडल्या. स्त्रीमनाचे नाजूक पदर कथेतून उलगडले आणि कथेच्या इतिहासात आपला असा एक ठसा निर्माण केला. वेगळे असे दालन समृध्द केले. स्त्री कथाकारांचा स्वतंत्र असा प्रवाह निर्माण केला. कथासागरात नजरेत भरण्याजोगी कामगिरी केली.

या दृष्टीने लेखिकांचे कथेचे वेगळेपण अनुभवाचे वेगळेपण अभ्यासावे वाटले. त्यांच्या कथेची वैशिष्टये पहाविशी वाटली. त्यांनी हाताळलेले विषय, समस्यांची केलेली मांडणी, कथेची शैली पहाविशी वाटली. या आणि इतर वैशिष्टयांची चिकित्सा श्रीमती प्रिया तेंडुलकर यांच्या 'ज्याचा त्याचा प्रश्न' आणि 'जावे तिच्या वंशा' हया कथासंग्रहाच्या आधारे करावयाची आहे.

साहित्य आणि साहित्यिक यांचा संबंध अत्यंत निकटचा असतो. कळत न कळत साहित्यिक आपल्या प्रतिकृतीमध्ये प्रकट होत असतो. या दृष्टीने

प्रिया तेंडुलकर या लेखिकेने लिहिलेल्या कथेचे वेगळेपण पाहण्यासाठी त्यांचे उपरोल्लेखित दोन कथासंग्रह निवडलेले आहेत. त्यांचा लेखनाचा काळ प्रामुख्याने १९८० नंतरचाच आहे. त्यामुळे १९८० दरम्यानचे आणि नंतरचे बदललेले स्त्रीजीवन त्याचे स्वरूप काय आहे? विविध क्षेत्रामध्ये स्त्रियांनी केलेले पदार्पण, स्त्रीअनुभवविश्वाचे बदलते व व्यापक स्वरूप या बदललेल्या समाजजीवनात स्त्रीस्वातंत्र्याची होणारी गळचेपी इत्यादी मुद्यांचा उपरोक्त कथासंग्रहांच्या आधारे घेण्याचा प्रयत्न केला आहे. कथेतील स्त्री पात्रांचे भावविश्व, स्त्रियांची संवेदनशीलता, भारतीय संस्कृतीचे चित्रण आणि स्त्रीवादाचा स्पर्श झाल्याने स्त्रियांचे होणारे वैचारिक परिवर्तन आणि यामुळे भारतीय संस्कृतीच्या पारंपारिक मूल्यविचारांना बसणारे धक्के यांचा अभ्यास केला आहे. त्याचबरोबर स्त्रीसमस्यांची मांडणी प्रिया तेंडुलकरांच्या लेखनशैलीचा विचार केला आहे. त्यांच्या कथा वाचकमनावर कशा परिणाम करतात? कशा संस्कारित होतात याचा अभ्यास केला आहे. आणि शेवटी उपसंहारात अभ्यासांती हाती आलेले प्रियातेंडुलकरांच्या कथेचे विशेष निष्कर्ष रूपात मांडलेले आहेत.

****

# प्रिया तेंडुलकर यांची साहित्यसंपदा

**कथासंग्रह**

१. ज्याचा त्याचा प्रश्न (१९८७)

२. असं ही (        )

३. जन्मलेल्या प्रत्येकाला (        )

४. जावे तिच्या वंशा (२०००)

**आत्मचरित्र**

१. पंचातारांकित

**इतर माहिती**

- जे.जे.स्कूल ऑफ आर्टस येथे चित्रकलेचा अभ्यासपूर्ण केला.
- हिंदी, मराठी, गुजराती आणि कन्नड चित्रपटात भूमिका
- पंचातारांकित हॉटेलात वेट्रेस, एअर लाईन्समध्ये हवाई परिचारिका, मॉडेलिंग, रंगभूमी, चित्रपट व दुरचित्रवाणी अशा विविध क्षेत्रात पदार्पण केले.
- मराठी आणि इंग्रजी वृत्तपत्रांतून स्तंभलेखन केले.
- 'रजनी' ही दुरचित्रवाणीवरील मालिका आणि 'टॉक शो' मुळे विशेष प्रसिध्दी.

❋❋❋❋